# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

**दूरध्वनी क्रमांक २२६१७९६९, फॅक्स : २२६९०००**

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in website : www.dtemaharashtra.gov.in


का.क्र १८ /तंशिसं/डिबीटी जाहीरात /२०१७/१३१ दिनांक: १८.०८.२०१७

## तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई मार्फत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना - MAHADBT PORTAL

### ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (CAP) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती.

### ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात राज्यातील अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या राज्यातील महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद व नागपूर) संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु.३,०००/- व राज्यातील इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु.२,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता. सदर निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय.

### ➢ उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना:-

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत , तांत्रिक व व्यावसायिक (पदविका, पदवी व पदव्युत्तर) अभ्यासक्रमात शिकणा-या राज्यातील **मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शिख, पारशी, जैन व ज्यू** या अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना ज्यांनी दहावी महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली आहे व ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त **रू.२५,०००/-**शिष्यवृत्ती.

**टिप** :- १) पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.

२) वरील योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. त्या करिता विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड नं. बँक खात्याशी संलग्नित करुन घ्यावे.

### ❖ वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-

१) सन २०१७-१८ पासुन विद्यार्थ्यांनी वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाकडुन नव्याने तयार करण्यात आलेल्या **राज्यस्तरीय डिबीटी पोर्टल / MAHADBT PORTAL** (संकेतस्थळ -

**www.mahadbt.gov.in**) वर देण्यात आलेल्या **युजर मॅन्युअल/एफएक्यू** चा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने व पोर्टल वर दिलेल्या सुचनांचे पालन करुन **अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत न थांबता** संपुर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घ्यावे.

२) ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्नीत नाहीत त्यांनी जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले आधार कार्ड नंबर मोबाईल नंबरशी संलग्न करुन घ्यावे.

❖ **सर्व संस्थाच्या प्राचार्यांना/संचालकांना सुचना देण्यात येते की, उपरोक्त योजनांची माहिती संस्थांच्या दर्शनी भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी व पात्र विद्यार्थ्यांना वरील योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी सहकार्य करावे व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेले अर्जांची पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने छाननी करावी.**

सही /-

नोडल ऑफिसर तथा संचालक,

तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई